सदैव तत्पर, सदैव सतर्क

Tel :- 022 22620453
E mail ID - dcpzone1-mum.@mahapolice.gov.in

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
पोलीस विभाग
**Dy. Commissioner of Police, Zone 1, Mumbai**
Walchand Hirachand Marg, Fort, Mumbai-400001.
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, मुंबई.
वालचंद हिराचंद मार्ग, फोर्ट, मुंबई-४०००० १

जा.क्र. २१२० /पोउआ/परि१/वा./२०२५ दिनांक -०५/०९/२०२५

प्रति,

पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण),
गुन्हे शाखा, मुंबई.

विषय - न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरूध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल....

संदर्भ - १) शासन निर्णय क्र. डीपीपी २०१५/प्र.क्र.५१/पोल१०, दि.२६/०२/२०१९
२) मु.नि.क. बि.सं. क्र. २३१/२५, दि. १७/०७/२०२५

उपरोक्त विषयास अनुसरून अहवाल सादर करण्यात येतो की, दि. ०१/०४/२०२५ ते दिनांक ३०/०६/२०२५ या कालावधीमध्ये पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-१ कार्यालयामध्ये न्यायालयीन प्रकरणांचा निकाल तपासी यंत्रणा अथवा सरकारी अभियोक्त्यांच्या हलगर्जीपणामुळे शासनाच्याविरूध्द गेला असल्यास संबंधीतांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या समितीच्या एका बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

सदर बैठकीकरिता परिमंडळ -१ मधील सर्व पोलीस ठाण्यांचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पैरवी अधिकारी व विधी अधिकारी, परिमंडळ -१ इत्यादी सदस्य उपस्थित होते. समितीच्या बैठकीमध्ये परिमंडळ-१ मधील दोषमुक्त झालेल्या ०९ खटल्यांच्या न्यायनिर्णयांची तपासणी करण्यात आली.

सदरचा अहवाल माहितीकरिता सादर करण्यात येत आहे.

(डॉ. प्रविण मुंढे) भा.पो.से
पोलीस उप-आयुक्त
परिमंडळ-१, मुंबई

Scanned with CamScanner

आयुक्तालय / पोलीस अधिक्षक कार्यालय :- पोलीस उप आयुक्त, परिमंडळ -१, मुंबई  समितीच्या बैठकीचा दिनांक :- दिनांक - ०५/०९/२०२५

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सेशन केस क्र. १४९/२०१९<br><br>कोर्ट नं. ३६<br>मा. न्यायाधीश<br>**श्रीमती. कल्पना के पाटील** | **कुलाबा पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. १८०/२०१७,<br>कलम ३६३,३७६(२),<br>भा.दं.वि सह कलम ६<br>पोक्सो | २७/०२/२०१९ | १४/०५/२०२५ | १. सदर गुन्ह्यातील पिडीत मुलगी मा. न्यायालयामध्ये फित्तूर झाली.<br>२. पिडीत मुलीने मा.न्यायालयामध्ये तीचे आरोपीसोबत प्रेमसंबंध असल्याचे कबुल केले.<br>३. पिडीत मुलीने मा. न्यायालयामध्ये तिच्या साक्षीमध्ये कबुल केले की ती स्वत: आरोपीच्या घरी कुटुंबासमवेत जाऊन राहत होती.<br>४. पिडीत मुलीचे वडील यांनी मा. न्यायालयामध्ये कबूल केले की, त्यांच मुलगी स्वत:हुन तिच्या मर्जीने आरोपी सोबत कुटुंबासमवेत जाऊन राहत होती.<br>५. पिडीत मुलीने मा. न्यायालयात कबूल केले की, १८ वर्षे पुर्ण झाल्यानंतरच आरोपी आणि पिडीत मुलीने लग्न केले. तसेच त्यांनी लग्न विधी पार पाडल्यानंतरच त्यांची लैंगिक संबंध प्रस्तापित केले.<br>६. सदर केसमध्ये वैदयकिय पुराव्याचा आभाव होता.<br>७. गुन्ह्यातील साक्षीदार फित्तूर झाले.<br>सदर केसमध्ये फिर्यादी व साक्षीदार फित्तूर झाले असल्यामुळे आरोपी दोषमुक्त झाला आहे. | **नाही** | - | - |
| २ | सेशन केस क्र. 65/PW/2018<br><br>मा. न्यायाधीश<br>**एन.एस. शेख** | **कुलाबा पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ५५१/२०१७,<br>कलम ३६३,३७६ भादवी<br>सह कलम ४,८ पोक्सो | ३०/०१/२०१८ | २२/०४/२०२५ | १. सदर केसमध्ये पिडीत मुलीने मा. न्यायालयामध्ये दिलेली जन्मतारीख आणि शाळेच्या अभिलेखावर असलेली जन्मतारीख ही पुर्णत: वेगळी होती.<br>२. पिडीत मुलीच्या जन्म तारखेमध्ये फरक असल्यामुळे पिडीत मुलगी बालिका असल्याचे सिध्द झाले नाही.<br>३. पिडीत मुलगी बालिका होती. अभियोक्ता पक्ष पुराव्या अभावी सिध्द करू शकले नाही.<br>४. पिडीत मुलीने मा. न्यायालयात सांगितले की, ती स्वत: आरोपीसोबत गेली होती.<br>५. पिडीत मुलीने न्यायालयात कबुली दिली की, तिचे व आरोपीचे प्रेमसंबंध होते व तिने संमतीने आरोपीसोबत लैंगिक संबंध प्रस्थापित केले.<br>६. सदर केसमध्ये पिडीत मुलीचा न्यायालयातील पुरावा अविश्वसनीय व दोषपूर्ण आढळून आला.<br>७. सदर केसमध्ये आरोपिविरुध्द कोणताही प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिस्थितीजन्य पुरावा आढळुन आलेला नाही.<br>एकंदरीत तपासी अधकारी यांनी पिडीत मुलीच्या जन्मतारखेचा योग्य पुरावा सादर न केल्यामुळे आरोपी दोषमुक्त झाला आहे. | **होय,**<br><br>पोउपनि<br>संदिप बोन्हाडे<br><br>पोनि<br>सदानंद माने | **मा. अपोआ, द.प्रा.वि. यांना अहवाल सादर** | - |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर करो, | जबाबदार अधिकाऱ्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३ | सेशन केस क्र. ११९/२००८<br><br>कोर्ट नं. ४६<br>मा. न्यायाधीश<br>**एस.ई. बांगर** | **कफ परेड पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. २०३/२००७,<br>कलम ४९८(ए), ३०४ (ब), ३४ भा.दं.वि | २८/०२/२००८ | १४/०५/२०२५ | १. सदर केसमध्ये प्रत्यक्षदर्शी पुरावा नाही.<br>२. सदर केसमध्ये बळीत मृत महिला हिच्या बाहय अंगावर कोणत्याही जखमा वैदयकिय अहवालामध्ये आढळून आल्या नाही.<br>३. सदर केसमध्ये साक्षीदारांचा पुरावा जबाब नोंदविण्यास विलंब झाला.<br>४. सदर केसमध्ये महत्वाचा साक्षीदार डॉक्टर यांना मा. कोर्टामध्ये तपासले नाही. मा. कोर्टात साक्षीसाठी बोलवले नाही.<br>५. सदर केसमध्ये मृत महिलेचा आरोपीने क्रुर छळ केल्यामुळे पिडीत महिलेचा मृत्यु झाला असल्याबाबत मा. न्यायालयात अभियोक्ता पक्ष सिध्द करू शकले नाही.<br>६. आरोपी पिडीत महिलेकडे हुंडा मागत होता मा. न्यायालयामध्ये सिध्द होऊ शकले नाही.<br>७. सदर केसमध्ये हुंडयाच्या मागणीच्या संदर्भात पिडीतेच्या मृत्युपूर्वी आरोपीने तिचा क्रुर छळ केला हे सिध्द करण्यासाठी कोणताही ठोस विश्वासार्ह पुरावा कायदेशिररित्या उपलब्ध झाला नाही.<br>८. सदर केसमध्ये साक्षीदाराकडून कोणताही ठोस पुरावा साक्षीदरम्यान उपलब्ध झाला नाही.<br>९. सदर केसमध्ये मुळ फॉरेन्स डेटा एकत्रित सादर करण्यास अभियोक्ता पक्ष अयशस्वी ठरला.<br>१०. सदर केसमध्ये आरोपीवर जो आरोप केला होता क्रुरता आणि हुंडाबळी छळ बळीत पिडीतेचे नातेवाईक हे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नव्हते.<br>११. सदर केसमध्ये हुंडा मागण्याचे आरोप अस्पष्ट आहेत.<br>**एकंदरीत पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे.** | **होय,**<br><br>१) पोउनि अरूण काशिनाथ धनावडे<br><br>२) पो.नि. दत्तात्रय हरिभाऊ शिंदे | मा. अपोआ, द.प्रा.वि. यांना अहवाल सादर |
| ४ | सेशन केस क्र. 313/PW/ 2019<br>कोर्ट नं. २५<br>मा. न्यायाधीश<br>**श्रीमती. प्रिया बनकर** | **कफ परेड पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. २५/२०१९,<br>कलम ३७६,५०६,३४१ भादवि सह कलम ४, पोक्सो ॲक्ट | २१/०५/२०१९ | ०३/०५/२०२५ | १. सदर केसमध्ये प्रत्यक्ष पुरावा किंवा अप्रत्यक्ष पुरावा नाही.<br>२. पिडीत मुलीच्या जन्मतारखेचा ओरिजीनल पुरावा अथवा जन्मतारखेचा कागदोपत्री पुरावा अभियोक्ता पक्ष मा. न्यायालयामध्ये सादर करू शकला नाही.<br>३. पिडीत मुलीने मा. न्यायालयामध्ये कबूल केले की तिच्या घरच्यांनी तिच्यावर दबाव आणल्यामुळे आरोपीविरुध्द तक्रार दिली.<br>४. पिडीत मुलीने उलटतपासणीमध्ये कबूल केले की, तिची आरोपीविरुध्द कोणतीही तक्रार नाही.<br>५. पिडीत मुलीने मा. न्यायालयामध्ये कबुल कले की, तिने आरोपीबरोबर लग्न केले आहे. | **नाही,** | |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुध्द केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ६. पिडीत मुलीने मा. न्यायालयामध्ये कबुल केले की,तिला आरोपीने कोणतीही धमकी दिलेली नाही व लैंगिक अत्याचार बळजबरीने केलेले नाही.<br>७. पिडीत मुलीने मा. न्यायालयामध्ये अभियोक्ता यांना सहकार्य केले नाही.<br>८. पिडीत मुलीच्या सि.ए. अहवालामध्ये SEMENS साबित होऊ शकले नाही.<br>९. पिडीत मुलीच्या वैदयकिय पुराव्यामध्ये आरोपीने लैंगिक छळ केल्याबद्दल कोणताही पुरावा मिळाला नाही.<br>**एकंदरीत सदर केसमध्ये पिडीत मुलगी फितुर झाल्यामुळे आरोपी दोषमुक्त झाला आहे.** | | | |
| ५ | सेशन केस क्र. १०३८/२०२१<br><br>कोर्ट नं. ५६<br>मा. न्यायाधीश<br>**श्री. अनिल डी साळुंखे** | **मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र.११/२०२०,<br>कलम ३५३,२७९,३३७<br>भा.दं.वि. सह कलम<br>१३२/१७७ मोवाका | १८/०९/२०२० | ०१/०४/२०२५ | १. सदर केसमध्ये फिर्यादी यांनी त्यांना झालेल्या जखमांबाबत मा. न्यायालयामध्ये तपशिलवार वर्णन दिले नाही.<br>२. सदर केसमध्ये साक्षीदारांची चौकशी केली नाही.<br>३. सदर केसमध्ये फिर्यादी यांनी त्यांच्या उलट तपासणीमध्ये कबूल केले नाही. सदर हाणामारीबद्दल व शिवीगाळीबद्दल फिर्यादी व साक्षीदार यांनी मा. न्यायालयामध्ये काहीही सांगीतले नाही.<br>४. सदर केसमध्ये कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याने आरोपीने फिर्यादी यांना कशी दुखापत केली हे सिध्द करण्यासाठी मा. न्यायालयात साक्ष दिली नाही.<br>५. ज्या दिवशी घटना घडली त्या दिवशी फिर्यादी कर्तव्यावर हजर होता असा कोणताही पुरावा मा. न्यायालयामध्ये आलेला नाही.<br>६. सदर केसमध्ये वैदयकिय अधिकारी यांची साक्ष झाली नाही.<br>**तपास अधिकारी यांनी तपास योग्य न केल्यामुळे आरोपीला त्याचा फायदा मिळाल्याने आरोपी दोषमुक्त झाला आहे.** | **होय,**<br><br>**पोउनि राहुल बाळासाहेब पाटील,** | **मा. अपोआ, द.प्रा.वि. यांना अहवाल सादर** | - |
| ६ | सेशन केस क्र. ३२२/२०२२<br><br>कोर्ट नं. ३३<br>मा. न्यायाधीश<br>**नझिरा एस.शेख** | आझाद मैदान पोलीस ठाणे<br>गु.र.क्र. ११/२०१२,<br>कलम ३७६<br>(२)(N)(K), ५०६(२)<br>भा.दं.वि.सह कलम ६<br>पोक्सो | २९/०३/२०२२ | १६/०५/२०२५ | १. सदर केसमध्ये घटनेचा प्रत्यक्षदर्शी किंवा अप्रत्यक्षदर्शी पुरावा नाही.<br>२. सदर केसमध्ये पंच फितूर झाले.<br>३. पिडीत मुलीने मा. न्यायालयामध्ये उलटतपासणीमध्ये कबूल केले की, तिच्या विधानातील मजकूर काय लिहीलेला आहे तिला माहित नाही. मजकूर मराठीमध्ये आहे. तिला मराठी येत नाही.<br>४. पिडीतेने मा. न्यायालयात कबूल केले की, तिचे आणि आरोपीताचे सतत भांडण होत असल्यामुळेच पिडीत मुलीचे | **नाही** | - | - |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशिल) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | जबाबदार असल्यास त्यांची नांवे, त्यांच्याविरुद्ध केलेली/ प्रस्तावित केलेली कार्यवाही | अ. क्र. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | एका व्यक्तीबरोबर प्रेम संबंध होते.<br>९. पिडीत मुलीच्या आईची, भावाची बहिणीची साक्ष झाली नाही. त्यांची साक्ष होणे गरजेचे होते.<br>६. साक्षीदार हे Habitual पंच होते. सतत अनेक गुन्ह्यात साक्ष देणारे पंच होते.<br>७. सदर केसमध्ये ज्या ठिकाणी घटना घडली होती. अगदी हाकेच्या आंतरावर पोलीस स्टेशन होते. रात्री हमेशा पोलीसांच्या गाडया येत जात असतात त्यामुळे पिडीत मुलीचा जबाब संशयास्पद दिसुन आला.<br>८. सदर केसमध्ये घटना ज्या ठिकाणी घडली तेथे CCTV कॅमेरे मोठया प्रमाणात लावलेले आहेत. त्यामध्ये काहीही आलेले नाही.<br>९. सदर केसमध्ये पिडीत मुलगी दररोज तिच्या भावाच्या बाजुला झोपायची असे पिडीतेने मा. न्यायालयामध्ये कबूल केले आहे.<br>१०. वैदयकिय अहवालामध्ये पिडीतेच्या वैदयकिय तपासणी अहवालामध्ये तिला कोणत्याही बाहय जखमा आढळलेल्या नाहीत.<br>११. सदर केसमध्ये पिडीत मुलीच्या जबानीवर मा. न्यायालयात अविश्वसनीयता दिसुन आली.<br>**एकंदरीत पिडीत मुलीच्या जबाबातील विरोधाभासामुळे व पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झाला आहे..** | | | |
| ७ | सेशन केस क्र. ८८/ १९९१<br><br>कोर्ट नं. ३०<br>मा. न्यायाधीश<br>**श्री. सचिन बलवंत पवार** | **आझाद मैदान पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ७१३/१९८८,<br>कलम ३०७ भा.दं.वि. सह कलम ११४ | ०१/०८/१९९० | ०३/०५/२०२५ | १. सदर घटना १९८८ सालची असल्यामुळे सदर घटनेतील साक्षीदार सापडले नाहीत. मा. न्यायालयाने समन्स काढून सुध्दा साक्षीदार कोर्टात आले नाही.<br>२. सदर घटनेतील एकमेव साक्षीदार मा. न्यायालयामध्ये फितूर झाला.<br>३. सदर घटनेतील साक्षीदाराने कोणताही ठोस पुरावा मा. न्यायालयात दिला नाही.<br>४. सदर केसमध्ये तपासी अधिकारी आणि साक्षीदार सापडले नाहीत.<br>५. सदर केसमधील मुख्य साक्षीदार गोपाळ रजवानी मयत झाला (समन्सचा अहवाला )<br>६. सदर केसमध्ये गोळीबाराची घटना सिध्द करण्यासाठी कोणताही ठोस पुरावा मा. न्यायालयामध्ये सरकार पक्ष सादर करू शकला नाही.<br>**एकंदरीत पुराव्या अभावी आरोपी दोषमुक्त झालेले आहेत.** | **नाही** | | |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. चा तपशील) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटला निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे. | जबाबदार असल्यास त्यांची नांव, त्यांच्याविरुद्ध केलेली / प्रस्तावित केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ८ | सेशन केस क्र. 2083/ PW/2019<br>कोर्ट नं.१९<br>मा. न्यायाधीश<br>**ए. सुब्रमणियम** | **सर जे जे मार्ग पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. ४७/२०१९,<br>कलम ३०२ भा.दं.वि. | १६/१२/२०१९ | २४/०४/२०२५ | १. सदर केसमध्ये महत्वाच्या साक्षीदाराने मा. न्यायालयात सांगीतले की आरोपीने मयत व्यक्तीवर हल्ला केल्याचे पाहिले नाही.<br>२. सदर केसमध्ये पंचानामा कसा व कोणत्या ठिकाणी केला याबाबत साक्षीदाराला मा. न्यायालयामध्ये सांगता आले नाही.<br>३. सदर केसमध्ये आरोपीने वापरलेल्या शस्त्राच्या स्वरूपाबाबत मा. न्यायालयात साक्षीदारांच्या जबाबात तफावत दिसून आली.<br>४. सदर केसमध्ये सर्व साक्षीदारांच्या पुराव्यामध्ये मा. न्यायालयाला तफावत आढळून आली.<br>५. सदर केसमध्ये सर्व साक्षीदार मा. न्यायालयामध्ये अविश्वसनीय आढळुन आले.<br>६. सदर केसमध्ये मा. न्यायालयात सादर पुरावा संशयास्पद आढळून आला.<br>७. सदर केसमध्ये मुख्य साक्षीदारांनी सांगीतले की, घटना जेव्हा घडली तेव्हा ते ५०० मीटर लांब होते. त्यांचा जबाब संशयास्पद आढळून आला.<br>**एकंदरीत पुराव्या अभावी व साक्षीदार फितूर झाल्याने आरोपी दोषमुक्त झाला आहे.** | **नाही,** | - | - |
| ९ | सेशन केस क्र. 786 /2023<br>कोर्ट नं. १७<br>मा. न्यायाधीश<br>**श्री.सुनिल.एम.पाटील** | **सर जे जे मार्ग पोलीस ठाणे**<br>गु.र.क्र. १५६/२०२३,<br>कलम ३०७,३५८, ५०४, ५०६(२), ३२३ भा.दं.वि. सह ४,२५ शस्त्र अधिनियम | ०२/०९/२०२३ | २३/०४/२०२५ | १. सदर घटनेमध्ये फिर्यादी मा. न्यायालयामध्ये फितूर झाला.<br>२. सदर केसमध्ये फिर्यादीने मा. न्यायालयामध्ये घटना झाल्यास नकार दिला.<br>३. सदर केसमध्ये घटना घडल्याचे मुख्य कारण अर्थिक देवाण घेवाण होते. फिर्यादी आणि आरोपीमध्ये देवाण घेवाण झालेली होती. मा. न्यायालयामध्ये फिर्यादीने कबूल केले की, त्यांच्यामध्ये अशी कोणतीही अर्थिक देवाण घेवाण झालेली नव्हती.<br>४. सदर केसमध्ये फिर्यादीने जो घटनेचा तपशील दिला होता. त्यास फिर्यादीने मा. न्यायालयामध्ये स्पष्ट नकार दिला आणि त्यास मराठी येत नाही व फिर्यादीमधील मजकुराची माहिती नसल्याचे कबुल केले.<br>५. तथाकथीत घटना व त्यातील आरोपीचा सहभाग यासबंधी फिर्यादी याने फिर्यादी पक्षाच्या कथनास पृष्टी दिली नाही.<br>६. फिर्यादीने दि.२०/०४/२०२३ रोजी आरोपीने नमुद वेळी व नमुद ठिकाणी फिर्यादीला चाकूने मारहाण केली त्यामुळे फिर्यादी जखमी झाला असे मा. न्यायालयात कबूल केले नाही. | **नाही,** | - | - |

Scanned with CamScanner

| अ. क्र. | प्रकरण क्रमांक / मा. न्यायालयाचे ठिकाण | प्रकरणाचे स्वरूप (गुन्हा नोंद क्रमांक, कलम इ. सा तपशील) | दोषारोप मा. न्यायालयात सादर केल्याचा दिनांक | न्यायनिर्णयाचा दिनांक | न्यायनिर्णयानुसार खटल्या निर्दोष होण्याची कारणे | खटला निर्दोष होण्यामागे तपासी अधिकारी अथवा सरकारी अभियोक्ता हे जबाबदार आहेत अगर कसे, | [illegible] |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | ७. फिर्यादी पक्षाच्या कथनास पुष्टी देणारा कोणताही पुरवा सदर साक्षीदारांच्या तपासणीमध्ये आलेला नाही.<br>८. सदर केसमधील पंच फितूर झाले.<br>९. सदर केसमध्ये फिर्यादीने मा. न्यायालयामध्ये कबूल केले की, आरोपीस फिर्यादी ओळखत नाही.<br>**सदर केसमध्ये फिर्यादी आणि पंच फितूर झाल्यामुळे आरोपी दोषमुक्त झालेले आहेत.** | | |

Scanned with CamScanner